दैनिक
# मराठवाडा पत्र
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर
रविवार
९.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०३
किंमत : ३ रू. पाने : ४
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955





# दिल्लीत कमळ फुललं!

दिल्ली । वृत्तसेवा

दिल्ली विधानसभा निवडणुकीत सत्ता राखण्यात आम आदमी पक्षाला अपयश आले आहे. तब्बल २७ वर्षानंतर भारतीय जनता पक्षाने दिल्लीत पुनरागमन केले आहे. आपचे दिग्गज नेते अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया तसेच सत्येंद्र जैन यांच्यासह प्रमुख नेत्यांचा पराभव झाला आहे. मध्य प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्रापाठोपाठ दिल्लीच्या जनतेनेही भारतीय जनता पक्षावर विश्वास दाखवला आहे. दिल्ली विधानसभेवर २७ वर्षांनंतर भाजपचा झेंडा फडकणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या सूक्ष्म नियोजनाने दिल्लीत भाजपला विजय मिळाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही ५० हजारांच्या आतपास बैठका घेतल्याचे सांगितले जाते. दिल्ली विधानसभेच्या एकूण ७० जागांपैकी भाजपने जवळपास ४९ जागा जिंकल्या आहेत तर आम आदमी पक्षाला केवळ २३ जागांवर समाधान मानावे लागले आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत भारतीय जनता पक्षाने सहापट अधिक यश मिळवले आहे.

## 'झाडू'ची जादू फेल अन् काँग्रेसचा सुपडासाफ






48 22 00

### निकालावर अरविंद केजरीवाल यांची प्रतिक्रिया

निवडणूक निकालानंतर आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी भाजपचे अभिनंदन केले आहे. गेले १० वर्ष आम्ही दिल्लीतील जनतेला केंद्रस्थानी ठेवून त्यांच्यासाठी काम केले. परंतु या निवडणुकीत जनतेने भाजपच्या हातात सत्तेच्या चाव्या देण्याचे ठरविले. जनादेश मान्य करून आम्ही प्रभावी विरोधी पक्षाची भूमिका निभावू, अशी ग्वाही केजरीवाल यांनी दिली आहे. निकालानंतर ▶▶पान २ वर

# मराठ्यांशिवाय तुमचं पानही हलू शकत नाही

## जरांगेंनी पुन्हा उपसलं उपोषणाचं हत्यार



जालना । प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आता आपल्या आंदोलनाची स्टाइल काहीशी बदलली आहे. ते आता मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटी येथे बेमुदत साखळी उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी शनिवारी माध्यमांसोबत संवाद साधतांना सांगितलं. यावेळी त्यांनी आंतरवाली सराटीसह मुंबईमध्ये तीव्र आंदोलन करणार असल्याचा निर्णय घेतला आहे. शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, दस्तावेज अभ्यासकाची नियुक्ती करावी तसेच गॅझेट लागू करावे. एसीबीसीच्या प्रकरणाची दखल घेणे आणि अजून काही मागण्या आम्ही पूर्ण करू, असे आश्वासन स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार सुरेश धस यांच्यामार्फत मी उपोषणाला बसल्यावर दिले होते. पण आता उपोषण सोडून १२ ते १३ दिवस उलटले असून, अद्याप एकही मागणी मान्य केलेली नाहीये, असं जरांगे म्हणाले. सरकारपेक्षा मराठा मोठा आहे हे सरकारला एकदा दाखवावंच लागेल. अंधारात एक बोलता आणि उजेडात दुसरं करतात. माझ्याशी गद्दारी करू नका. मराठ्यांशिवाय तुमचं पानही हलू शकत नाही. सत्ता आल्यापासून मी सन्मानाने बोलत होतो, पण तुम्ही आमच्या लेकरा बाळांच्या जीवाशी खेळत आहात! अशा आक्रमक शब्दांत जरांगे पाटील यांनी फडणवीसांवर तीव्र टीका केली. सरकार स्थापन होताच पहिल्या कॅबिनेटमध्ये एकही मागणी मान्य ▶▶पान २ वर

# भररस्त्यावर तरूणावर हल्ला

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटना पाहता बीड हे गुन्हेगारांचं हॉटस्पॉट ठरलं आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. हत्या आणि हवेत गोळीबार, या बातम्या ताज्या असतानाच आणखी एक खळबळजनक बातमी समोर येत आहे. जुन्या वादाच्या कारणावरून डोळ्यात मिरची पावडर टाकत कात्रीनं जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याची घटना घडली आहे. ही धक्कादायक घटना बीडच्या माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथे घडली आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गुरूवारी सायंकाळच्या सुमारास बीडच्या लोणगावात एक धक्कादायक घटना घडली आहे. जुन्या वादातून एकाने डोळ्यात मिरची पावडर टाकत केस कापण्याच्या कात्रीने जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. तुझ्या भावाने माझ्यावर केस का केली? असा जाब विचारत डोळ्यात मिरची



## डोळ्यात मिरची पावडर, कात्रीनं सपासप वार

पावडर टाकून कात्रीनं हल्ला केला. या प्रकरणी दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अनिल आत्माराम गायके हा तरुण लोणगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातून घरी चालत जात होता. यादरम्यान, सोनकांबळे ▶▶पान २ वर

# ११ बालकांना खिचडीतून विषबाधा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा येथील अंगणवाडीत शनिवार (दि८) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास खिचडी खाल्ल्याने ११ बालकांना विषबाधा झाल्याची घटना घडली. या बालकांवर माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा या ठिकाणी असलेल्या अंगणवाडीत २९ बालकी असून त्यापैकी ७ बालके शनिवारी उपस्थित होते. या अंगणवाडीतील मुलांबरोबर शेजारी असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील काही विद्यार्थी या ठिकाणी खिचडी खाण्यासाठी ▶▶पान २ वर

# बीडमध्ये आ.क्षीरसागरांकडून बंधारा कम पुल जागेची पाहणी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदार संघातील विकास कामांचा समतोल कायम ठेवला आहे मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात सुरू झालेली विकासकामे गतीने पुढे सरकावीत यासाठी स्वतः उभा राहून आमदार संदीप भैया लक्ष देत आहेत. शनिवारी (दि.८) सकाळी बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत असलेल्या जागेची त्यांनी पाहणी केली. तसेच तेलगाव नाका येथे पाण्याच्या नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. बीड



शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत आहे.या जागेची आ.संदीप क्षीरसागरां कडून पाहणी करण्यात आली. लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात देखील होणार आहे. काम सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी व चाचण्या घेण्याचे काम सुरू आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली. बीड शहरातील ▶▶पान २ वर

# बीड जिल्ह्यातील रस्ते अपघाताची मालिका सुरूच

बीड । प्रतिनिधी

देवदर्शन करून गावाकडे परतताना चारचाकी वाहन पुलाला धडकून घडलेल्या अपघातात दोन जण ठार तर दोन गंभीर जखमी झाल्याची घटना मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास मांजरसुंबा - अहमदनगर रस्त्यावर मुळूकवाडी फाट्यावर घडली आहे. कालच केज जवळ अपघातात दोघांचा बळी गेला बारा तास उलटत नाहीतर रात्री अपघात होऊन यातही दोघांचा बळी गेला. यामुळे बीड जिल्ह्यातील रस्ते अपघातांची मालिका चिंतेचा विषय ठरत आहे. बीड जिल्ह्यातील रस्ते झाले पण

## मांजरसुंबाजवळ पुन्हा अपघात ;दोन ठार

सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्ते कुचकामी ठरत असल्याचे वाढत्या अपघाताच्या घटना वरुन दिसून येते आहे. काल सकाळीच के ज तालुक्यातील सांगवी जवळ याच महामार्गावर अपघात होऊन दोन जण ठार झाले. या घटनेला १२ ▶▶पान २ वर

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या

# बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे,शेख रिजवान



### जिल्हा कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बालाजी तोंडे, शेख रिजवान तर कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांच्या निवड करण्यात आली. असल्याची घोषणा राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची बीड जिल्हा कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, यांच्या मान्यतेने राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी घोषित केली असुन जिल्हा कार्यकारिणीमध्ये जिल्हा उपाध्यक्षपदी दत्ता आजबे, आप्पासाहेब महानोर, प्रशांत लहुरीकर सचिवपदी राहुल गायकवाड, सहसचिव नितीन मुंडे, सदस्यपदी गणेश जाधव, उदय नागरगोजे, रामेश्वर जाधव, बंडु दुबाले, मनोज गव्हाणे, निलेश येलगिरे, बाळासाहेब वरकड, निलेश वाघमोडे यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ही पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी लढणारी, त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणारी संघटना आहे. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी वाचा फोडण्यासाठी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दीक्षाभूमी ते मंत्रालयात पत्रकार संवाद यात्रा काढून पत्रकारांचे प्रश्न प्रभावपणे सरकार ▶▶पान २ वर

# अखेर ७ महिन्यानंतर जिल्हा रुग्णालयाच्या सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले

बीड । प्रतिनिधी

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागणीची डॉ.अशोक थोरातांकडुन दखल-डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची देखभाल व स्वच्छता करण्यासाठी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी नकार दिला होता.प्रशासन देखील हे काम कर्मचाऱ्यांना करायला लावण्यास धजावत नव्हते त्यामुळे मागील ७ महिन्यांपासून स्वच्छतागृह कुलुपबंद होते. परीणामी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आंतररूग्ण विभागात दाखल रूग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक तसेच सोनोग्राफी करण्यासाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला असा दररोज हजारो ▶▶पान २ वर



# कॉपी करताना हजारदा विचार करा!

पुणे । वृत्तसेवा


## बोर्डाचा मोठा निर्णय,थेट अजामीनपात्र गुन्हा

दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा लवकरच सुरू होत आहे. या परीक्षांत कॉपी करणं विद्यार्थ्यांना महागात पडणार आहे. गैरप्रकार रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. आता परीक्षेत गैरप्रकार करताना आढळल्यास थेट दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच अशा प्रकारांना उद्युक्त करणारे आणि मदत करणाऱ्यांवरही थेट कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा शिक्षण मंडळाने दिला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेला यंदा ३१ लाखांवर विद्यार्थी सामोरं जात आहेत. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू होत असून १४ लाख ९४ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. ▶▶पान २ वर



# ती ‘एआय’ होती म्हणुनी...

कृत्रिम बुद्धिमत्ता–आर्टिफिशियल इंटलिजन्स (एआय)–या विषयाच्या चर्चेस आता चांगलीच गती आलेली दिसते. विज्ञान, तंत्रज्ञानविषयक चर्चांचा परीघ आणि खोली वाढत असेल तर त्याचे केव्हाही स्वागत. कोणत्या मुहूर्तावरील स्नान आत्मिक उन्नती अधिक करेल इत्यादी चर्चेपेक्षा विज्ञान, तंत्रज्ञानाची चर्चा जैविक (बायोलॉजिकल) आणि मर्त्य मानवांसाठी अधिक उपयोगी. त्यामुळे ती आपल्याकडे सुरू झाली ही बाब महत्त्वाची. ती वाढण्यास भले निमित्त सॅम आल्टमन याचा भारत दौरा हे असेल. पण त्यामुळे चर्चा सुरू होण्याचे महत्त्व कमी होत नाही. सॅम हे मायक्रोसॉफ्ट–पुरस्कृत ‘ओपन एआय’चे कर्तेधर्ते. त्यांचे ‘चॅटजीपीटी’ हे एआयस्त्र आज आपल्याकडेही अनेकांच्या संगणक, मोबाइलवर सुखाने स्थानापन्न झाल्याचे दिसते. या एआय विश्वास गेल्या आठवड्यात चीनने हादरा दिला. चीनने स्वत:चे ‘डीपसीक’ हे स्वतंत्र एआयस्त्र बाजारात आणले. त्यामुळे जगापेक्षाही अधिक धक्का आपणास बसला. कारण भारतातही हे ‘डीपसीक’ वापरले जाण्याची शक्यता. त्यामुळे आपण ही बाब गांभीर्याने घेतली आणि एआयसाठी कसे काय काय करता येईल याची वाच्यता केली गेली. तंत्रज्ञान असो वा संरक्षण. चीन हा देश कार्यक्रमपत्रिका ठरवतो आणि त्याबरहुकूम जगास आणि त्यातही आपणास वागावे लागते. हे उलट होताना दिसत नाही. म्हणजे आपण कशात पुढाकार घेतलेला आहे आणि चीनला त्याची दखल घ्यावी लागत आहे, असे होत नाही. सर्व प्रक्रिया उलट. एआयबाबतही तसेच होताना दिसते. आता आपण एआयसाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करत असून अर्थसंकल्पातही ५०० कोटी रुपये या क्षेत्राच्या विकासासाठी यंदा खर्च होतील. तेवढे तर तेवढे! सुरुवात होणे महत्त्वाचे. ती झाली. सॅम आल्टमन यांच्या भारत दौऱ्याने तीस गती आली. आता आपल्या यासंदर्भातील प्रयत्नांविषयी. त्यावर भाष्य करण्याआधी सॅम आल्टमन भारतात का आले, ही बाब लक्षात घ्यायला हवी. ‘‘भारत ही आमच्यासाठी अमेरिकेनंतरची दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे’’, अशा स्पष्ट शब्दांत आल्टमन यांनी आपला इरादा स्पष्ट केला. उगाच ताकाला जाऊन भांडे लपवण्याचा प्रयत्न नाही. त्यानंतर आपले उच्च तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव आदींनी आल्टमन यांच्याशी चर्चा केली. या चर्चेचे सार असे : अमेरिका वा चीन यांनी एआय विकसनासाठी जितका खर्च केला आहे त्याच्या काही अंशात भारत स्वत:चे एआय प्रारूप विकसित करू शकतो. म्हणजे भारताचे प्रारूप त्यांच्यापेक्षा स्वस्त असेल; असा त्याचा अर्थ. हे आपले वैशिष्ट्य. त्याचे कौतुक करावे किंवा काय हाही प्रश्न. पहिल्यांदा काही विकसित करणे, त्याची सर्वोत्कृष्टता इत्यादीपेक्षा इतरांपेक्षा स्वस्त हा आपला हुकमी एक्का राहिलेला आहे. मग ते उपग्रह प्रक्षेपण असो की अन्य तंत्रविस्तार. एआयबाबतही प्रतितास एक डॉलरपेक्षाही कमी खर्चात संगणन (कम्प्युटिंग) करून देणारे प्रारूप आपण विकसित करून देणार आहोत. त्यासाठी विविध विज्ञान संस्था, विद्यापीठे वा तंत्रसमूहांस आवश्यक ते भागभांडवल सरकारतर्फे पुरवले जाईल. त्यासाठी सरकारी पातळीवर प्रस्ताव मागवले जाणार असून या क्षेत्रात भरीव काही करू शकतील असे किमान सहा नवे नवउद्यामी (स्टार्टअप्स) सरकारच्या डोळ्यासमोर आहेत. त्यांच्याकडून पुढील दहा महिन्यांत एआयचे खास भारतीय बनावटीचे प्रारूप सादर होईल. साधारण पाच–सहा दशकांपूर्वी अमेरिकेने आपणास महासंगणक देण्यास नकार दिला तेव्हा भारतीय तंत्रज्ञांनी स्वतंत्र शक्कल लढवून ती क्षमता साध्य केली. ‘समांतर संगणन’ (पॅरलल कम्प्युटिंग) ही ती युक्ती. म्हणजे एक महाप्रचंड क्षमतेचा संगणक जे करू शकेल ते आपण लहान क्षमतेचे संगणक समांतर पद्धतीने एकत्र कामास लावून साध्य केले. या लहान संगणकांची ‘बुद्धिमत्ता’ एकाच वेळी समांतर पद्धतीने कामाला जुंपली आणि त्याद्वारे महासंगणनाचे लक्ष्य साध्य केले. तसेच काही आपण एआयसंदर्भात करू पाहतो आहोत. उदाहरणार्थ चीनचा ‘डीपसीक’ हा २००० जीपीयू (ग्राफिक्स प्रोसेसिंग




युनिट्स) क्षमतेवर काम करतो. जीपीयू म्हणजे अत्यंत गुंतागुंतीचे संगणन करण्याची क्षमता असणाऱ्या अत्युच्च दर्जाच्या चिप्स. कमीतकमी जागेत जास्तीत जास्त अशा चिप्स बसवण्याची क्षमता असणारे सेमीकंडक्टर्स विकसित करणे हे हार्डवेअरचे आव्हान. आपण सद्या:स्थितीत बनवलेल्या लहानात लहान चिपचा आकार २० नॅनोमीटर (एक नॅनोमीटर म्हणजे एका मीटरचा १०० कोटी इतका सूक्ष्म अंश) इतका आहे. मात्र जगात प्रगत देशांनी बनवलेल्या चिप्स फक्त पाच नॅनोमीटर इतक्या सूक्ष्मातिसूक्ष्म आहेत. अशा कमालीच्या उच्च दर्जाच्या हार्डवेअरला तितक्याच उच्च दर्जाच्या संगणनाची–सॉफ्टवेअरची– जोड एआयसाठी आवश्यक. यावर सध्या हुकमत आहे ती अमेरिका आणि चीन या दोन देशांची. म्हणूनच चीनचा ‘डीपसीक’ विकसित झाला. तो हजार जीपीयूचा होता तर चॅटजीपीटीच्या पहिल्या आवृत्तीचा एआय तब्बल २५ हजार जीपीयूवर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर आपण गाठलेली क्षमता १५ हजार जीपीयूंची आहे. सद्या:स्थितीत चिपनिर्मिती क्षेत्रात जागतिक बाजारात आपला वाटा एक टक्का इतकाही नाही. यात आघाडीवर आहेत ते तैवान, दक्षिण कोरियादी देश. ‘एनविडिया’सारखी या क्षेत्रातली कंपनी ही अर्थाकाराने इतकी दिव्य आहे की आपण तिची तुलनाही करू शकत नाही. या कंपनीस मायक्रोसॉफ्ट, ॲपल अशा कंपन्यांची साथ असल्याने अमेरिकी कंपन्यांनी यात घेतलेली गती कल्पनातीत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपले मित्रबित्र असले आणि त्यांची सत्ता यावी यासाठी आपल्याकडे अनेकांनी देव पाण्यात घालून ठेवले, ‘अगली बार’ असा प्रचार केला हे खरे असले तरी हे चिपतंत्रज्ञान भारतास सहज मिळणार नाही, असाच अमेरिकेचा प्रयत्न आहे. त्यामुळे ज्यांनी ‘देसी’ महासंगणक विकसित केला त्या ‘सेंटर फॉर ॲडव्हान्स कम्प्युटिंग’ (सी–डॅक) या संस्थेकडे हे काम सोपवण्यात आलेले आहे. हे सर्व छानच. तथापि खरे आव्हान आहे ते उच्च गुणवत्तेचे अभियंते तयार करणे हे. चीनचे ‘डीपसीक’ हे संपूर्णपणे देशांतर्गत बनावटीचे आहे आणि त्यासाठीच्या चिप्सही त्यांच्याच आहेत. म्हणजे हार्डवेअरही त्यांचे आणि सॉफ्टवेअरही चिनी. हे सत्य लक्षात घेतल्यास मानवी गुणवत्ता आणि तांत्रिक क्षमतानिर्मिती यांचे महत्त्व लक्षात येईल. मानवी तांत्रिकतेबाबत आपले आशाकेंद्र म्हणजे पं. नेहरू–कालीन आयआयटीज आणि एखादे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स वा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च. तेही त्याच काळातील. पुढे सगळा आनंदच. हे झाले उच्च शिक्षणाबाबत. ते ज्यावर आधारित असते त्या प्राथमिक शिक्षणाची लक्तरे दिवसागणिक निघत असतात. शिक्षणाची तरतूद दुप्पट केली जाईल असे २०१४ पासून सांगितले जात असले तरी त्यात तसूभरही फरक पडलेला नाही. पं. नेहरूंच्या नावे बोटे मोडत असताना गेल्या दहा वर्षांत याबाबत काय झाले हा प्रश्न. एआयनिमित्ताने तो अधिकाधिक गंभीर होत जाणार यात शंका नाही. प्रत्येक भारतीय बालक जन्मत:च एआयशी परिचित असते अशी कोटी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिल गेट्स यांच्याशी एआयवरील चर्चेत केली. माता–संबंधित आई, आय हे शब्द आणि एआय असा हा कोटी–बंध. अनेकांस तो चतुर वाटला असेलही. तिचा आधार घेत एआयच्या आव्हानाबाबत ग्रेस यांच्या कवितेचा आधार घेत इशारा देणे इष्ट. नपेक्षा भविष्यात ‘घनव्याकुळ मीही रडलो’ असे म्हणण्याची वेळ येण्याचा धोका संभवतो.

# ‘आप’–दा पासून आता मुक्तता

## ‘दिल्ली’ जिंकल्यानंतर पंतप्रधान मोदींचं भाषण

दिल्ली, (वृत्तसेवा):–दिल्ली निवडणुकीतील ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजप मुख्यालयात पक्ष कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी यमुना मैय्या यांच्या स्तुतीने भाषणाची सुरुवात केली. पंतप्रधान मोदी म्हणाले, ‘आज दिल्लीत, दिल्लीतील लोकांमध्ये उत्साह आणि शांतता आहे. दिल्लीला आप–दा पासून आता मुक्तता केल्याबद्दल विजयाचा उत्साह आणि समाधान आहे’ असं म्हणत पंतप्रधान मोदींनी जोरदार भाषण केलं. २७ वर्षांनंतर भाजपने दिल्ली काबीज केली आहे दिल्ली विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयामुळे भाजपमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पंतप्रधान मोदी यांनी भाजप मुख्यालयात पोहोचले. यावेळी त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करत दिल्लीच्या विजयबद्दल सगळ्यांचे आभार मानले. ‘मी प्रत्येक दिल्लीवासीयांना एक पत्र पाठवलं होतं आणि तुम्ही सर्वांनी हे पत्र प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवलं आहे. मी दिल्लीला प्रार्थना केली होती की, भाजपला २१ व्या शतकात सेवा करण्याची संधी द्यावी, भाजपला दिल्लीला विकसित भारताची विकसित राजधानी बनवण्याची संधी द्यावी.

पान १ वरून

### दिल्लीत कमळ...

केजरीवाल यांचा चेहरा पूर्णपणे उतरला होता, आवाजही खोल गेला होता. त्यांच्या देहबोलीतून त्यांच्या मनात असंख्य प्रश्नांचा काहूर माजल्याचे स्पष्टपणे दिसत होते. दिल्लीच्या जनतेने भाजपला बहुमत दिले, त्याबद्दल भाजपचे अभिनंदन. भाजपने लोकांच्या इच्छा आकांक्षांसाठी काम करावे. दिल्लीच्या लोकांनी आम्हाला १० वर्ष बहुमत दिले. आम्ही आरोग्य, शिक्षण, वीज यावर आम्ही प्रभावी काम केले. दिल्लीच्या इन्फ्रास्ट्रक्चरवरही आम्ही काम केले. परंतु यावेळी आम्हाला जनतेने विरोधकांची भूमिका सांभाळण्यास सांगितले आहे. आम्ही केवळ विरोधी पक्षांची भूमिका निभावणार नाही तर आम्ही लोकांच्या सुख दु:खात सहभागी होऊ. आम्ही केवळ सत्तेसाठी राजकारणात आलो नाही तर आम्ही सत्तेच्या माध्यमातून लोकांची सेवा करण्यासाठी, त्यांचे दु:ख कमी करण्यासाठी राजकारणात आलो, असे केजरीवाल म्हणाले. आपच्या कार्यकर्त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. तुम्ही खूप चांगल्या प्रकारे निवडणूक लढली. यादरम्यान तुम्हाला खूप काही सोसावे लागले, तरीही तुम्ही मागे हटला नाहीत. भाजपला विजयासाठी शुभेच्छा, अशी प्रतिक्रिया निकालानंतर अरविंद केजरीवाल यांनी दिली.

### मराठ्यांशिवाय तुमचं...

झाली नाही. आता होणाऱ्या दुसऱ्या कॅबिनेटमध्ये काय होईल हे माहिती नाही. आता आम्ही आमच्या न्याय हक्कांसाठी रस्त्यावर आमचा लढा उभा करणार आहोत. पण त्याआधी १५ फेब्रुवारीपासून आम्ही आंतरवाली सराटीत बेमुदत साखळी उपोषण सुरू करणार आहोत. राज्यातील प्रत्येक शहरात, प्रत्येक गावात हे आंदोलन उभं राहणार आहे. शांततेत आंदोलन कसे केले जाते आता हे मुख्यमंत्र्यांना कळेल, असा तीव्र इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी दिला आहे.

### भररस्त्यावर तरूणावर...

यांच्या किराणा दुकानासमोर गावातीलच आरोपी गोपाळ पांडुरंग राऊत यानं हातातील मोबाईल फोन हिसकावून घेत मोबाइल जमिनीवरच फोडला. नंतर मिरची पावडर त्याच्या डोळ्यात टाकली आणि कात्रीने त्याच्या छातीवर सपासप वार केले. या हल्ल्यात अनिल गायके याने आरडाओरडा केला. अनिल गायकेचा आवाज ऐकताच त्याचा भाऊ ज्ञानेश्वर गायके पळत आला. त्याच्याही मानेवर राऊत याने कात्रीने वार केले. त्यानंतर रस्त्यावरील लोकांनी त्या ठिकाणी धाव घेत गायके भावडांना वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर गोपाळ राऊत याने तेथून पळ काढला. यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, गोपाळ राऊत याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास दिंद्रुड पोलीस करीत आहेत.

### बीडमध्ये आ. क्षीरसागरांकडून...

तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी परिसरात सूरु असलेल्या रस्ता कामांची पाहणी केली. याबरोबरच बीड शहरातील प्रभाग क्र.२२ मधील कै.शिवाजी धांडे नगर भागातील मुख्य नाल्याची पाहणी करून नाल्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत आ.संदीप भैय्यानी संबंधित यंत्रणेस निर्देश दिले. तसेच या परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी देखील केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. सध्या बीड शहरातील शाहूनगरमधील आदर्श नगर भागात सिमेंट रस्ता कामासह विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी चर्चा केली. बीड शहरासह मतदारसंघातील विकास कामांचा वेग यापुढेही असाच कायम ठेवला जाईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार...

दरबारी मांडले त्यातून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र दोन महामंडळाचे सरकारने घोषणा केली. संघटनेने सामाजिक आणि समाजाभिमुख उपक्रमामध्ये सातत्याने मोठे योगदान दिले आहे. नव्याने नियुक्त केलेल्या बीड जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी देखील पत्रकारांच्या प्रश्नाबाबत सजग राहून सामाजिक उपक्रमांना बळ देतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केला आहे.तर राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी नवीन पदाधिकार्यांना शुभेच्छा देत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ही केवळ संघटना नाही तर पत्रकारांच्या न्याय हक्काची चळवळ आहे. लहान–मोठ्या उपक्रमाच्या माध्यमातून पत्रकार संघ सातत्याने चांगले उपक्रम राबवत राहील असे सांगितले. प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी नवनियुक्त पदाधिकार्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### बीड जिल्हयातील रस्ते...

तास उलटत नाही तर मांजरसुंबा–पाटोदा दरम्यान चारचाकी वाहनाचा अपघात झाला. यातील प्रवासी हे डॉक्टर असून आताच ४ फेब्रुवारी रोजी लग्न झाल्याने हे डॉक्टर दांपत्य दर्शनासाठी गेले होते. जेजुरी येथून दर्शन करुन वझुर बुद्रुक ता. मानवत (जि. परभणी) कडे जात होते. दरम्यान सदरील वाहन क्र. एम.एच. २२ ए

पान १ वरून

एम ४५७१ अहमदपूर– अहमदनगर महामार्गावरील मांजरसुंबा मुळूकवाडी जवळ आले असता वाहन पुलाच्या कठड्यावर जाऊन धडकले. ही धडक इतकी भीषण होती की, समोरील बाजूने वाहन पूर्ण चेंदामेंदा झाले असून, यामध्ये डॉ. ओंकार ज्ञानोबा चव्हाण, डॉ. मृणाली भास्कर शिंदे हे दोघे ठार झाले. डॉ. ऐश्वर्या मंथन चव्हाण, डॉ. मंथन चव्हाण असे दोघे गंभीर जखमी आहेत. पुलाला धडक बसताच झालेल्या मोठ्या आवाजाने नागरिक झोपेतून जागे झाले आणि त्यांनी अपघाताच्या दिशेने धाव घेत अपघातग्रस्तांना मदत केली. जखमींना बीड येथे जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. बीड जिल्ह्यातील हे वाढते अपघात चिंतेचा विषय ठरत असून, प्रशासनाने या दृष्टीने काही उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात येत आहे.

### कॉपी करताना हजारदा...

तर १६ लाख ७ हजार विद्यार्थी दहावीची परीक्षा देणार आहेत. या परीक्षेसाठी तब्बल १ लाख ८० हजारांहून अधिक मनुष्यबळ कार्यरत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना काही अडचण असेल तर त्यासाठी समुपदेशक नेमण्यात आले आहेत. त्यांची मदत विद्यार्थ्यांना घेता येईल. पण कॉपी करणे विद्यार्थ्यांना महागात पडणार असल्याची माहिती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिलीये.

* कॉपी न करण्याचे आवाहन : परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विविध बैठका झाल्या असून विद्यार्थ्यांसाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थी आणि त्यांना कॉपी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्यांवरही थेट गुन्हा दाखल केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रलोभनांना बळी पडू नये आणि शांतपणे पेपर लिहावेत. कोणत्याही प्रकारे कॉपी करू नये, असे आवाहन मंडळाने केले आहे. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण असेल, परीक्षेचा तणाव असेल तर ते समुपदेशकाची मदत घेऊ शकतात. फोनवर त्यांना संपर्क करू शकतात, असेही मंडळाने स्पष्ट केलेय. * हॉल तिकीट विसरले तरी परीक्षेची मुभा : हॉल तिकीट विसरलेल्या विद्यार्थ्याला त्या दिवशी परीक्षेला बसू दिले जाईल. मात्र त्याच्याकडून हमीपत्र लिहून घेतले जाईल आणि दुसऱ्या दिवशी मात्र त्याला हॉल तिकीट आणावेच लागेल. परीक्षेला कोणत्याही वेशभूषेत येता येईल, असेही परीक्षा मंडळाने स्पष्ट केले आहे. मात्र विद्यार्थ्यांची तपासणी केल्यावरच त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार आहे.

### अखेर ७ महिन्यानंतर...

लोकांचा रूग्णालयात राबता असतो.मात्र जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे? असा प्रश्न पडला होता त्यामुळे शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत होती. त्यामुळे नागरीकांची गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने सार्वजनिक स्वच्छतागृहे खुले करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना लेखी निवेदनाद्वारे केली होती.अखेर याची दखल घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या आदेशाने जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले असुन येथीलच कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे काम देण्यात आले आहे. यामुळे नागरीकांची विशेषत: महिलांची होणारी हेळसांड थांबली आहे. * स्वच्छतागृह सुरू करण्यात आले असून लवकरच नविन माता व बाल रुग्णालयातील स्वच्छतागृहे वापरात येतील– जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात : जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृह सुरू करण्यात आले आहे.आता माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नव्याने बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह बांधण्यात आलेले आहे. लवकरच त्याचाही वापर सुरू करण्यात येईल असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी सांगितले.

### ११ बालकांना...

आले होते. खिचडी खाऊन ही बालके आपापल्या घरी गेली. त्यानंतर दुपारी एक वाजेच्या सुमारास अंगणवाडीलौज ७ व ४ जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या बालकांना अचानक मळमळ व उलटीचा त्रास सुरू झाला. अंगणवाडी सेविका कविता राठोड यांनी सरपंच सुनील तर व उपसरपंच दयानंद बोबडे यांना याची माहिती दिली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे यांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ रुग्णवाहिका पाठवून बालकांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सर्वांवर उपचार करण्याल आले असून प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. घुबडे यांनी सांगितले. अंगणवाडीत शिकणारी श्रावणी नवनाथ राठोड (वय ३ ) संध्या लखन राठोड (वय ५), पल्लवी अतुल राठोड (वय ५), प्रीतम रवींद्र राठोड (वय ५), देवांश अजय राठोड (वय १८ महिने) रा. फुलसिंग तांडा त्याचबरोबर आर्यन परमेश्वर राठोड (वय ४), आरव परमेश्वर राठोड (वय ३) रा. टाकरवन येथील बालके आहेत. त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणारे अक्षर लहू चव्हाण, देवांश अजय राठोड (वय ३) रा. वारोळा, इशिता देविदास धनगाव (वय ७), प्रथमेश दिलीप पवार (वय ७) व प्रांजल दिलीप पवार (वय ८) हे सर्व रा. फुलसिंग तांडा येथील रहिवासी आहेत.

पान ४ वरून

### क्रीडा महोत्सवातून...

आ. विजयसिंह पंडित यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण करताना ते बोलत होते. शारदा स्पोर्ट्स कडमीच अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन शारदा विद्या मंदिर गेवराई येथे करण्यात आले होते. यावेळी आ.विजयसिंह पंडित, सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले, नगरसेवक शाम येवले, युवानेते पृथ्वीराज पंडित, डॉ.अशोक काळे, दत्ताभाऊ पिसाळ, नवीद माशायक, दीपक आतकरे, खाजा मामू, विष्णुपंत घोंगडे, संतोष सुतार, दिनेश घोडके, वसिम फारोकी, विजय सुतार, सरवर पठाण, संदीप मडके, दत्ता दाभाडे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. *जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आ.विजयसिंह पंडित यांचा हृदय सत्कार : कार्यक्रमात जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आ.विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना विजयसिंह पंडित म्हणाले की, पराभवाला खचून न जाता एक ध्येय ठेवून मी काम सुरु केले. कामात सातत्य ठेवले. लोकामध्ये मिसळत गेलो. त्यामुळे मला नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. शिवछत्र परिवार हा व्यापक आहे. शिवछत्र परिवारातील प्रत्येक सदस्याने माझ्यासाठी लोकामध्ये जाण्याचा प्रयत्न केला त्यामुळेच मला हे यश मिळाले. माय बाप मतदारांचे आशीर्वाद, कार्यकर्ते आणि जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील प्रत्येक कर्मचार्याने प्रामाणिकपणे मेहनत आणि कष्ट केल्यामुळे मला प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली असून आपल्याला जमिनीवर राहून काम करायचे आहे. आदरणीय शिवाजीराव दादा पंडित यांच्या लोकसेवेचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी आपल्याला सर्वांना मिळून काम करायचे आहे. गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये मोठे काम करून एक आदर्श निर्माण करायचा आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कबड्डी, व्हॉलीबॉल, खो–खो, बॅडमिंटन, बुद्धीबळ, स्पर्धेतील विजेत्या खेळाडूना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून ज्ञानेश्वर धापसे, अमोल राठोड यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट खेळाडू म्हणून यशराज तिपाले, ज्योती तागड, करण पवार, सखू राठोड, कार्तिक वाघ, अमृता ठोंबरे, अतिश पवार, ऋतुजा बावचकर, देवराज निकम, अमर घाडगे, कोळेकर अश्विनी यांचाही सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट शाळा म्हणून शिवशारदा पब्लिक स्कूलचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मागील तिन वर्षापासून क्रीडा महोत्सव उत्कृष्ट पद्धतीने आयोजित केल्या बद्दल शिवशारदा पब्लिक स्कूलच्या वतीने रणवीर पंडित यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादाराव काकडे व सुधीर गाडे यांनी केले. उपस्थितांचे आभार जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर यांनी मानले. यावेळी सहप्रशासन अधिकारी प्रा.काशिनाथ गोगुले, प्रताप हातोटे, प्राचार्य डॉ.विश्वास कदम, डॉ.सदाशिव सरकटे, डॉ.राजाभाऊ चव्हाण, प्राचार्या क्षीरसागर, मुख्याध्यापक राजेंद्र जगदाळे, किशोर पंडित, वसंत राठोड, रणजीत सानप, दत्तात्रय देशपांडे, तौर अशोक, सय्यद युनुस, अरुण हाटकर, भक्तराज पौळ, शिवाजी पाटोळे, भागवत राऊत, पवार बबन, पवार विश्वनाथ, पवार मुरलीधर, संतराम राठोड, लक्ष्मण काळे, दिलीप पवार, विजय येवले, बोरुडे सुनील, महारुद्र राख, रोहिणी लाखुटे, रमेश डावकर, राजूरकर उमेश, हरिभाऊ हाकाळे यांच्यासह सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व क्रीडा प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आदित्य पॉलिटेक्निक...

संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली होती. यामध्ये एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळा आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली तेव्हा कार्यशाळेचे मेकॅनिक हेड रवींद्र आदे व विद्युत विभाग हेड नाना भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तांत्रिक ज्ञान–बसची रचना, इंजिन, ट्रान्समिशन, ब्रेकिंग सिस्टीम, आणि इतर यांत्रिक भागांचे कार्य याबद्दल माहिती दिली. तसेच पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. हरित ऊर्जेचा वापर, इलेक्ट्रिक बसेस, आणि इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली. नियमित सर्व्हिसिंग, वाहन दुरुस्ती आणि मेंटेनन्स कसा केला जातो हे त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवले. या शैक्षणिक भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना बसच्या इंजिन, ट्रान्समिशन, ब्रेकिंग सिस्टिम आणि इतर तांत्रिक बाबींचे प्रत्यक्ष ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले. वाहन देखभाल आणि दुरुस्ती प्रक्रियेबद्दल विद्यार्थ्यांना स्वात: जाणून घेता आले. ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग ( मेकॅनिकल) क्षेत्रातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. केवळ पुस्तकातील ज्ञान न राहता प्रत्यक्ष यंत्रसामग्री आणि तांत्रिक प्रक्रिया पाहण्याचा अनुभव मिळाला त्यातून व्यावहारिक शिक्षण आणि अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. या

पान ४ वरून

शैक्षणिक भेटी दरम्यान प्रा. लक्ष्मण तांबे, प्रा. अजय दुधाळ आणि प्रा. नितीन गायकवाड यांची उपस्थिती होती. * परिक्षेत्र भेटीतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक ज्ञानात भर पडते : विभागीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी भेट दिल्याने त्यांना विविध शैक्षणिक फायदे होऊ शकतात. अशा भेटीद्वारे विद्यार्थ्यांना, बस व्यवस्थापन, तांत्रिक देखभाल, वाहतूक नियोजन आणि प्रवासी सेवा याबद्दल प्रत्यक्ष माहिती मिळते. यामुळे त्यांच्या वाहतूक व्यवस्थापन, यांत्रिकी, आणि सार्वजनिक सेवा या क्षेत्रांतील ज्ञानात वाढ होते. ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक विकासाला चालना मिळते. असे यावेळी बोलताना –प्रा. लक्ष्मण तांबे म्हणाले.

### वडवणी ते चिंचोटी...

तात्काळ दुरुस्ती करावी अन्यथा वंचित बहुजन युवा आघाडी कडून महात्मा फुले चौक वडवणी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी दिला आहे या निवेदनाच्या प्रतिलिपी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद बीड, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव, जिल्हापरिषद बीड यांनाही देण्यात आले आहे.

### गुगळादेवी नैसर्गिक...

येथील लाईव्ह प्रदर्शन डेमो हे पाहण्याचा दोन्ही गटांना योग आला ,तसंच दोन्ही गटांना भेटलेले साहित्य कृषी ऑफिस बीड यांच्यामार्फत निमार्क ग्रेट वन , ग्रेट टू ,फवारणी किट, मूग बियाणे, तसेच महाबीज तर्फे गटातील सहा सदस्यांना टोकण यंत्र अर्ध्या लोक वाटेवर तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने व खामगाव घतघ चे संचालक डॉक्टर हनुमान गरुड सर यांच्या माध्यमातून दोन्ही गटांना बियाणे वाटप महिलांसाठी फुले समाधान व पुरुषासाठी फुले विश्वास बियाणे वाटप तसेच खामगाव किवीकेच्या माध्यमातून निविष्ठापन वाटप यांच्या रॅली औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ईट येथील पहिली ते तिसरीच्या मुलांना बालमित्र उजळणीचे बाराखडी चे पुस्तक देऊन तसेच चौथी ते पाचवी च्या विद्यार्थ्यांना वह्या देऊन व सहावी ते आठवी च्या विद्यार्थ्यांना रजिस्टर देऊन आमच्या दोन्ही गटाने सामाजिक कार्य पूर्ण केले तसेच गुगळा देवी गटाचे अध्यक्ष रामप्रसाद अशोक डोईफोडे यांनी सेंद्रिय शेती विषय व जमिनीची सुपीकता विषयी गावकऱ्यांना व शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच आपल्या पाणी फाउंडेशनचा जयजयकार परभणी कृषी विद्यापीठ असेल खामगाव केवीके असेल की बीड आकाशवाणी यांच्या माध्यमातून आपल्या शेतीची चळवळ ही मोठ्या प्रमाणात रामप्रसाद डोईफोडे यांनी पुढे चालवली आहे आणि ही अशीच चळवळ पुढेही चालू ठेवणार अशी दोन्ही गटाच्या सदस्यांनी निश्चय केला त्यानंतर पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक शिवलेश्वर मेदने सर व पाणी फाउंडेशन चे ट्रेनर श्री विशाल करंडे सर व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मुरकुटे ,सर गंडगे सर ,खोसे सर ,व त्यांचा पूर्ण स्टाफ याप्रसंगी उपस्थित होते तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी दोन्ही गटाचे मानले आभार त्यावेळी गावकरी मंडळी शाळेतील विद्यार्थी मंडळी व दोन्ही गटातील सर्व सदस्य मंडळी हजर होती हा सर्व कार्यक्रम पार पडला त्यावेळी दोन्ही गटातील सदस्य खूप आनंदी होते.

### शेतरस्त्याचा सर्वे...

त्यामुळे शेतक–यांच्या नित्याच्या वापरातील अत्यावश्यक रस्त्यांची सोय करणे शक्य होत नसल्याने शिवश्री कृषि मंडळाच्या वतीने श्री.शिवराम राऊत यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांना पूर्वपार,प्रचलित आसणा–या रस्त्यांची प्रशासनाने जायमोक्यावर पाहणी करून या रस्त्यांची सुयोग्य नोंदी महसुली अभिलेखात नमुद करुन भूमी अभिलेख कार्यालयातील गाव नकाशात या सर्व रस्त्यांचे प्रमाणिकरण करावे अशी निवेदना द्वारे मागणी केली आहे.

### एनएमएम परीक्षेत...

जाते. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सातव्या ते दहाव्या वर्गापर्यंत वार्षिक शिष्यवृत्ती मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळते आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी मोठा आधार मिळतो. वसुंधरा विद्यालय कोळपिंप्री येथील सहावी वर्गातील नारायणी थोरात आणि सुरज साळवे यांनी यश मिळवल्याने सर्वत्र कौतूक होत आहे.

### घरासमोर दडलाय सोन्याचा...

कायदा २०१३ आणि भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अत्यंत गंभीर प्रकार असून या प्रकरणातील आरोपीचे मोठे जाळे असू शकते. त्यामुळे याबाबतीत कठोर कारवाई व्हावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या आणि अंधश्रद्धा निर्मूलन समित कार्यकर्त्या सत्यभामा सौंदरमल यांनी सांगितलं. यासंदर्भात दिंद्रुडचे पोलीस निरीक्षक यांना विचारणा केली असता आरोपीला अटक केली आहे तपास सुरू आहे यावर आत्ताच प्रतिक्रिया देणार नाही असं सांगितलं.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# सोयाबीन पाठोपाठ कापूस उत्पादक शेतकरी संकटात

## सीसीआय केंद्रावर कापूस खरेदी १० दिवसांपासून बंद



मुंबई, (वृत्तसेवा) :- एकीकडे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला दर मिळत नसताना, दुसरीकडे शासनाकडून सुरू असलेली सीसीआयची खरेदी १० दिवसांपासून बंद करण्यात आली आहे. अचानक बंद करण्यात आलेल्या खरेदीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला आहे. कारण, खासगी बाजारात कापसाला जेमतेम भाव मिळत आहे. अशा परिस्थितीत सीसीआयच्या केंद्रावर बऱ्यापैकी भाव शेतकऱ्यांना मिळत होता. मात्र, सीसीआयची केंद्र देखील बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण झाली आहे. खासगी बाजारात कापसाला केवळ ६२०० ते ६५०० रुपयांचे दर मिळत आहेत. काही ठिकाणी तर हे भाव ६००० रुपयांपर्यंत घसरले आहेत. सीसीआयची खरेदी थांबल्यानंतर खासगी बाजारातील कापसाचे दर कमी होत जात आहे. त्यामुळे सीसीआयकडून कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. दुसरीकडे सोयाबीन उत्पादक शेतकरी आक्रमक झाला आहे. केंद्र सरकारकडून सोयाबीन खरेदी बंद करण्यात आली आहे. मात्र अद्याप राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी बाकी आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीसाठीची मुदत वाढवावी अशी मागणी शेतकरी करत आहेत. राज्य सरकारने केंद्र सरकारला पत्र पाठवत १३ फेब्रुवारी पर्यंत खरेदी सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता केंद्र सरकार यावर काय निर्णय घेतय हे पाहणे महत्वाचे असणार आहे. सोयाबीनच्या मुद्द्यावरुन विरोधक देखील आक्रमक झाले आहेत. सोयाबीन खरेदीची मुदत वाढवावी अन्यथा तीव्र आंदोलन पुकारू इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरकारला दिला आहे. तर काही नेत्यांकडून कापूस खरेदी ही एक महिना सुरू राहावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# ज्ञानेश्वरी सेवा आश्रम काडीवडगाव देवडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात

## किर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा-ज्ञानेश्वर महाराज बादाडे

वडवणी, (प्रतिनिधी):-तालुक्यातील काडीवडगाव देवडी रोड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सद्गुरु जोग महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामुदाईक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ज्ञानेश्वरी कंठ भुषण ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक श्री ह भ प भागवत महाराज बादाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.या सप्ताहामध्ये नामांकित कीर्तनकारांची हजेरी लाभत आहे.तरी पंचक्रोशीतील भावी भक्तांनी या किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजक ह भ प ज्ञानेश्वर महाराज बादाडे यांनी केले आहे. सविस्तर वृत्त असे की सद्गुरू जोग महाराज यांच्या पुण्यतीथी निमीत्त देवडी काडीवडगाव रोड ज्ञानेश्वरी सेवा आश्रम माऊली नगर येथे भव्य दिव्य अखंड हरीनाम सप्ताहातील दैनंदीन कार्यक्रम सकाळी चार ते सहा काकडा भजन,सहा ते सात विष्णु सहस्त्रनाम, दुपारी दोन ते चार एकाच अभंगावरील ७दिवस किर्तन सेवा, सात ते दहा ज्ञानेश्वरी पारायन,सां चार ते पाच ज्ञानेश्वरी प्रवचन,पाच ते सहा हरीपाठ,रात्री सात ते नऊ हरी किर्तन नंतर भोजन शुक्रवार दि ७ रोजी हंसराज महाराज मगर,शनिवार ८ रोजी परमेश्वर महाराज वरकड,रविवार दि ९ रोजी ज्ञानेश्वर



महाराज बादाडे,सोमवार दि १० रोजी बबन महाराज बहीरवाल,मंगळवार दि ११ रोजी लक्षमण महाराज कोकाटे,बुधवार दि १२ रोजी प्रकाश महाराज बोधले, गुरुवार दि १३ रोजी प्रकाश महाराज जंजीरे,दि १४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ज्ञानेश्वरी कंठ भुषण ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व संत वाङ्मयाचे थोर उपासक श्री ह भ प भागवत महाराज बादाडे यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद महापंगतीचे यजमान जयसिंह भैय्या सोळंके व्हा चेअरमन लो सुं सोळंके स साखर कारखाना यांचे आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सप्ताहातील किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजक श्री ह भ प ज्ञानेश्वर महाराज मोहन बादाडे यांनी केले आहे.

# के.एस.पी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारोप उत्साहात

बीड, (प्रतिनिधी):- दि.०७ फेब्रुवारी २०२५ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील दहावीच्या विद्यार्थ्यांन करिता निरोप समारोप साजरा करण्यात आला. इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा २१ फेब्रुवारी २०२५ पासुन सुरु होणार आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यात अशी वेळ येते जेव्हा त्याला आपल्या प्रिय सोबतीनां सोडून जावे लागते आणि बऱ्याचदा अश्या वेळी निरोप समारंभाचे आयोजन देखील केले जाते. त्यामुळे शाळेतील इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचे आयुष्यातील शालेय जीवन संपन्न होणार आहे. त्यांना निरोप देण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात मुलांनी आपल्या शालेय जीवनातील अनुभव आपल्या मनोगतातुन व्यक्त केले. मनोगत



व्यक्त करतांना काही मुले भाऊक झाली. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी मुलांना पुढील शैक्षणिक जीवनामध्ये कोणतेही पाऊल उचलताना कोणते क्षेत्र आपणासाठी योग्य आहे, निर्णय कसे घ्यावे या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमास संस्थाध्यक्षा सौ. अंजलीताई शेळके तसेच शाळेतील प्र. मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.

# राज्य सरकारचा मोठा निर्णय!

## 'या' शेतकऱ्यांना रेशन ऐवजी थेट पैसे मिळणार

मुंबई, (वृत्तसेवा):- महाराष्ट्र शासनाने छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभाग तसेच नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यातील एपीएल (केशरी) रेशनकार्डधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजनेस मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना त्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यात थेट आर्थिक मदत मिळणार आहे. सदर योजनेची सुरूवात ही जानेवारी २०२३ पासून सुरू करण्यात आली आहे.आरंभीची रक्कम दरमहा १५० रुपये प्रति लाभार्थी होती. आता सुधारित रक्कम २० जून २०२४ पासून



दरमहा १७० रुपये प्रति लाभार्थी अशी करण्यात आली आहे. योजनेचा लाभ छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभागातील सर्व तसेच वर्धा जिल्ह्यातील विपत्तीग्रस्त केशरी रेशनकार्डधारक शेतकऱ्यांना मिळणार आहे. या रकमेचा थेट हस्तांतरण डीबीटी (ऊळीशलीं इशपशषळीं ढीरपीषशी) प्रणालीद्वारे केली जाणार आहे. लाभार्थी व्यक्ती ही अर्ज त्यांच्या स्थानिक स्वस्त धान्य दुकान करू शकतात. बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत, रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पानाची प्रत

# विश्वविजेता खो-खो संघाच्या कर्णधार कु.प्रियंका इंगळे यांनी ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांची घेतली भेट



किल्लेधारूर, (प्रतिनिधी):-भारतीय विश्वविजेता खो खो संघाच्या कर्णधार कु. प्रियंका इंगळे यांनी ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांची भेट घेत प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष हितगुज साधत अनेक प्रश्न विचारत माहिती जाणून घेतलीविद्यार्थ्यां च्या चेहऱ्यावरील आनंद पाहून प्रियंका इंगळे यांनी तुम्हाला आवडीच्या खेळामध्ये करियर करण्याच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांशी भारतीय खो-खो संघाच्या कर्णधार कु. प्रियंका इंगळे यांनी प्रत्यक्ष सदिच्छा भेट दिली. भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी प्रियंका इंगळे यांच्याशी प्रत्यक्ष संवाद करता हितगुज साधले अनेक मनातील प्रश्न विचारले विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून खो खो संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे यांनी विद्यार्थ्यांना तुमच्या आवडीच्या खेळांमध्ये करिअर करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सय्यद शाकेर, अनिल महाजन, विद्यालयाचे मुख्याध्यापक शेख शाहिद,विठ्ठल सुरवसे, मुंजाराम निरडे, शेख, राजू शेख व विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज तालुक्याच्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करणे अभिमानास्पद-रमेश आडसकर

## प्रियंका इंगळे हीचा आडसला जंगी सत्कार

केज, (प्रतिनिधी) :- खो-खो विश्वकप स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करत देशाला विश्वकप मिळवून देण्याची किमया या भागाच्या मातीतील प्रियंका इंगळेने केल्याची बाब अभिमानास्पद आहे. पालकांनी पाल्यांना त्यांच्या निवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे प्रतिपादन अंबा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेशराव आडसकर यांनी केले. शुक्रवारी (दि. ७) तालुक्यातील आडस येथे श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था व ग्रामस्थांच्या वतीने भारतीय महिला खो - खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हीच्या नागरी सत्कार सोहळ्यात श्री. आडसकर बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण अध्यक्षस्थानी होते. माजी उपसभापती ऋषीकेश आडसकर, माजी जिल्हा परिषद सदस्य भागवत नेटके, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन उद्धवराव इंगोले, माजी सरपंच बालासाहेब ढोले, उपसरपंच गोविंद पाटील यांच्यासह प्रियंका इंगळे चे आई-वडील उपस्थित होते. प्रास्ताविक श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेश देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी देशाला पहिला खो-खो विश्वकप जिंकून देर्णाऱ्या प्रियंका इंगळे चा शाल-श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रोख एक्केवीस हजार रूपये देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच तिच्या आजी-आजोबा व आई-वडीलांचा भरपेहरावाचा आहेर देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थीतांचे स्वागत शालेय विद्यार्थीनींनी सादर केलेल्या स्वागत गीताने करण्यात आले. सुत्रसंचलन सुरेश शिनगारे यांनी केले. साजिद शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी



श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता. कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी व आडससह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'कॉपी'ची कुप्रथा

राज्यात बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. प्रत्येकाच्या शैक्षणिक जीवनात या दोन्ही परीक्षा अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात. नोकरीकरिता 'बायोडेटा' बनवताना त्यामध्ये दहावी आणि बारावीची टक्केवारी नमूद करण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. या परीक्षेतील टक्केवारीनुसार माणसाच्या बौद्धिक क्षमतेची कल्पना 'बायोडेटा' पाहणाऱ्याला येते. शिवाय या दोन्ही परीक्षा नेहमीच्या शाळा आणि महाविद्यालयांत न होता या परीक्षांसाठी अन्य केंद्रात जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांवर अपरिचित वातावरणात परीक्षा देण्याचा ताणही असतो. परीक्षा काळात समस्त परिक्षाकेंद्रात पोलीस शिपाई नियुक्त केले जातात, कॉपी करण्याच्या प्रथेवर आळा घालण्यासाठी शासनाचे भरारी पथक कार्यरत असते. शाळेतील पर्यवेक्षकांचे विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष असते. यंदाच्या या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे सरकार राज्यभर मोहीम राबवणार आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी तसे आदेश संबंधितांना दिले आहेत. परीक्षा केंद्रांवर नजर ठेवणासाठी यंदा ड्रोनचाही वापर केला जाणार आहे. या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री स्वतः जातीने लक्ष घालत आहेत. परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडल्यास तत्परतेने गुन्हा नोंदवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स परीक्षा काळात बंद ठेवण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येणार आहे. या दोन्ही परीक्षांच्या कालावधीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कॉपी केली जाते, कॉपी करणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणारे त्यांचे हितचिंतक कॉपी करण्याच्या आणि कॉपी पुरवण्याच्या विविध क्लुप्त्या शोधून काढतात. दरवर्षी परीक्षाकाळात प्रतिदिन यासंदर्भातील बातम्या वाचायला मिळतात. काही ठिकाणी आपल्या शाळेचा निकाल चांगला



लागावा यासाठी पर्यवेक्षक शाळेतील मुलांना पुस्तके पुरवतात. काही ठिकाणी तर बोर्डाच्या परीक्षेच्या काळात ठराविक कमिशनच्या मोबदल्यात थेट बाकापर्यंत कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या पाहायला मिळतात. या मंडळींनी पोलिसांपासून शाळेच्या पर्यवेक्षकांनाही 'मॅनेज' केलेले असते. बोर्डाच्या परीक्षेकरिता एका बाकावर एकच विद्यार्थी बसवण्याची सक्ती असताना परीक्षा केंद्रांमध्ये २ विद्यार्थ्यांना एकाच बाकावर बसवून एकमेकांच्या संगनमताने पेपर सोडवण्याची अनुमती दिल्याचा प्रकार मागच्या वर्षे संभाजी नगरात घडला होता. काही ठिकाणी पेपर सोडवण्याचा कालावधी संपण्याच्या काही मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांना कॉपी करण्याची, एकमेकांना उत्तरे विचारण्याची अनुमती दिली जाते. काही शाळांमध्ये शाळेच्या खिडक्यांबाहेर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणाऱ्यांची जत्रा भरलेली असते. यांना पोलीसही हटकण्याची तसदी घेत नाहीत. काही विद्यार्थी तर कॉपी करण्यात अगदीच पटाईत असतात त्यांना इतका आत्मविश्वास असतो कि ते परीक्षेसाठी कधीही अभ्यास न करता मिळालेला संपूर्ण वेळ कॉपी तयार करण्यामध्ये घालवतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून काही ठिकाणी पर्यवेक्षक स्वतःच विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे सांगतात किंवा कॉपी करण्याची खुली अनुमती देतात. सरकारने यंदा ज्या पद्धतीने सिद्धता केली आहे ते पाहता यंदा कॉपी करण्यावर बऱ्याच प्रमाणात आळा बसेल असे म्हणण्यास हरकत नाही. मुलांचे वय हे संस्कारक्षम असते. लहान वयात होणारे संस्कारच त्यांचे भवितव्य ठरवत असतात. शालेय जीवनात परीक्षेत कॉपी करून उत्तीर्ण होण्याची सवय जडलेले महाभाग पुढील आयुष्यातही यश मिळवण्यासाठी 'शॉर्टकट'चा किंवा गैरमार्गाचा अवलंब करू पाहतात. पौगंडावस्थेत असतानाच कॉपी करण्याची सवय लागल्याने भविष्यात असे करण्यात काही चुकीचे आहे असेही त्यांना कधी वाटत नाही. कॉपी केल्यामुळे आपण परीक्षा उत्तीर्ण होऊ मात्र पुढील व्यवहारिक जीवनात परीक्षेचे प्रसंग हे पदोपदी येणार आहेत त्यावेळी आपल्या बुद्धिमत्तेची आणि विवेकाची कसोटी लागणार आहे, तेव्हा आपल्याला कोण साहाय्य करणार ? कॉपी करणे म्हणजे निव्वळ आपल्या स्वार्थासाठी गैरमार्गाचा अवलंब करणे. कॉपी करणे म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर प्रामाणिकपणे आणि नेटाने अभ्यास केला आहे त्यांच्यावर अन्याय करणे. कॉपी करणे म्हणजे स्वतःला गुन्हेगारीची सवय लावून घेणे. कॉपी करणे म्हणजे मेहनतीला डावलून शॉर्टकट शोधण्याची सवय अंगीकारणे . वर्षभर अभ्यास करून परीक्षेला आनंदाने सामोरे जाणे ही नैतिकता आहे, तर वर्षभर उनाडक्या करून ऐन परीक्षेच्या काळात अभ्यास झाला नाही म्हणून कॉपी सारख्या गैरमार्गाचा अवलंब करणे ही अनैतिकता आहे. परीक्षेचे पेपर सोडवण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करण्याची सवय विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात भ्रष्टाचाराने आणि गैरमार्गाने धन कमावण्याची सवय लावते. गुन्हेगारी क्षेत्रात विद्यार्थ्यांचे आणि उच्चशिक्षितांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शाळांमध्ये नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे मध्यंतरी अनिवार्य करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत असला तरी मानसिक आणि भावनिक विकासासाठी तसेच योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता येण्यासाठी शालेय जीवनात नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे. आजमितीला हा विषय शिकवण्याकरिता अनेक शाळांनी शिक्षकच नियुक्त केलेले नाहीत. बऱ्याच शाळांमध्ये या विषयाच्या तासिकेत विद्यार्थ्यांना अन्य विषय शिकवले जातात, एकूणच या विषयाला शाळांकडून दुय्यम स्थान देण्यात येत आहे. बालपणापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि अनैतिक गोष्टींविषयी सजगता आली कि मुले कॉपीसारख्या कुप्रथेच्या आहारी जाणार नाहीत.

**जगन घाणेकर**
**मो.९६६४५५९७८०**

# राज्य उपाध्यक्षपदी अनिल चांदणे यांची निवड



बीड, (प्रतिनिधी न्यूज) :-भाजपमध्ये निष्ठेला न्याय मिळतोच, अगदी याचप्रमाणे अनिल चांदणे यांच्याही निष्ठेला न्याय देण्याचे काम भाजपने केले आहे. लोकनेत्या राज्याच्या पर्यावरण व हवामान आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने, जिल्ह्याच्या माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या नेतृत्वाखाली अनिल चांदणे यांची भाजपा अनुसुचित जाती मोर्चाच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. याबद्दल श्री. चांदणे यांचे बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन केले जात आहे. पक्ष, संघटनेसाठी देत असलेले योगदान आणि त्यांची निष्ठा पाहूणच त्यांच्या निष्ठेला भारतीय जनता पार्टीने न्याय देण्याचे काम आज केले आहे. लोकनेत्या राज्याच्या पर्यावरण व हवामान आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने, बीड जिल्ह्याच्या माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या नेतृत्वाखाली अनिल चांदणे यांची भाजपा अनुसुचित जाती मोर्चाच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यांना या निवडीचे पत्र स्वत: लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. भाजपसह ताईसाहेबांनी दिलेली ही नवी जबाबदारी अत्यंत निष्ठेने पार पाडून पक्ष आणि संघटनेला पावलोपावली मजबूत करण्याचा प्रयत्न मी निश्चित करेल, असा विश्वास आपल्या निवडीनंतर अनिल चांदणे यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर
# मराठवाडा पत्र
रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२५ पान - ४

## एनएमएमएस परीक्षेत वसुंधरा विद्यालयाचे यश
# दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

किल्लेधारूर, (प्रतिनिधी):-वसुंधरा माध्यमिक विद्यालय, कोळपिंपरी येथील नारायणी दत्तात्रय थोरात व सुरज आशोक साळवे हे दोन विद्यार्थी राष्ट्रीय अर्थसहाय्य आधारित मेरिट स्कॉलरशिप एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत, शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. एनएमएमएस ही परीक्षा आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी घेतली ▶▶पान २ वर





# क्रीडा महोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू घडतील-आ.विजयसिंह पंडित



## दिमाखदार सोहळ्यात खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण

गेवराई, (प्रतिनिधी):- पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीने घेतलेल्या जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या क्रीडामहोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. पुढील काळात या क्रीडा महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यासाठी तालुक्यातील इतर शाळांच्या विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतले जावे. कोणत्याही क्षेत्रात ध्येय गाठायचे असेल तर सराव आणि सातत्य महत्वाचे आहे. वर्षभर खेळाचा सराव आणि स्पर्धेमध्ये सातत्य ठेवल्यामुळे गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागामधील खेळाडू या महोत्सवात घडत आहेत ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. विजयाच्या उन्मादाने वागायचे नाही आणि पराभवाने खचून जायचे नाही ही भूमिका ठेवून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे असे आवाहन ▶▶पान २ वर



### ऊर्जा देणारा हा क्रीडा महोत्सव-कालिदास नवले

खेळाची मोठी परंपरा शिवाजीराव दादा पंडित परिवाराला आहे. तोच वसा आणि वारसा घेऊन रणवीर पंडित यांनी सर्व सामन्यांची लेकरं देश पातळीवर क्रीडा क्षेत्रात चमकावीत हे स्वप्न पहिले. आणि ते साध्य करण्यासाठी धडपड करत आहेत. खेळाडूना ऊर्जा मिळावी म्हणून हा क्रीडा महोत्सव होत असून ग्रामीण भागातील लेकरांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याचे काम शिवछत्र परिवार करत आहे असे गौरवोद्गार सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले यांनी काढले.

### ■ आपली वेगळी ओळख निर्माण व्हावी-रणवीर पंडित

आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातील आपल्या मातीतील खेळाडू घडावेत आणि पुढे जावेत, हे माझे स्वप्न आहे. आपल्या भागातील विद्यार्थी उद्या देशाचे नेतृत्व करतील याचा मला विश्वास आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंनी आपली चमक दाखवली. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थी खेळाडूंची मेहनत यामुळे हा क्रीडा महोत्सव यशस्वी झाला आहे. यापुढील काळातही व्यापक पद्धतीने क्रीडा महोत्सव घेवून क्रीडा क्षेत्रात गेवराई तालुक्याची वेगळी ओळख निर्माण होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### ■ शिवछत्र परिवाराने उल्लेखनीय काम केले-नवीद मशायक

शिवछत्र परिवाराने गेल्या अनेक वर्षा पासून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केले असून मला सुद्धा यातूनच फुटबॉल क्षेत्रामध्ये नाव कमवता आले. रणवीर पंडित यांची तळमळ ही आपल्या भागातील विद्यार्थ्यांना घडवायची आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून त्यांनी गेवराई तालुक्यात खेळाचे वातावरण तयार केले आहे. त्यामुळेच शिवशारदा पब्लिक स्कूल आणि शारदा क्रीडा कडमच्या फुटबॉल खेळाडूंची महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण झाली ही अभिमानाची गोष्ट आहे. आपण दोन घंटे जिद्दीने आणि तळमळीने या खेळासाठी दिले तर या भागातील विद्यार्थी यशाचे शिखर गाठेल असे प्रतिपादन फुटबॉलचे राष्ट्रीय खेळाडू तथा प्रशिक्षक नवीद मशायक यांनी केले.

# आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाची एसटीच्या विभागीय कार्यशाळेला भेट

## विद्यार्थ्यांनी जाणून घेतले बस व्यवस्थापन, तांत्रिक देखभाल,वाहतूक नियोजन

बीड, (प्रतिनिधी):-शहरातील नामवंत आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणीक अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यशाळा १ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी एसटीचे आगार, विभागीय कार्यालय, आणि बसस्थानक याचा संपूर्ण अभ्यास करत तेथील व्यवस्थापन तांत्रिक देखभाल आणि वाहतुकीचे नियोजन याची माहिती जाणून घेतली. ही शैक्षणिक भेट संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण ▶▶पान २ वर



# घरासमोर दडलाय सोन्याच्या बिस्किटांचा हंडा, बाहेर काढण्यासाठी घातला १० लाखांचा गंडा

बीड, (प्रतिनिधी) :- बीडमध्ये सोने मिळवण्याच्या आशेने लाखोंचा गंडा घालण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील दिंद्रुडमध्ये जादूटोण्याच्या नावाखाली तब्बल १० लाख ६२ हजारांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. पोलिसांनी आरोपी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे. बीडच्या माजलगाव तालुक्यातील नित्रुड गावात राहणाऱ्या संगीता परमेश्वर साखरे यांना एका महिलेने 'तुमच्या घरासमोरील मोकळ्या प्लॉटमध्ये दोन किलो सोन्याच्या बिस्किटांचा हंडा आहे' असे सांगितले. मात्र, तो काढण्यासाठी काही विधी करावे लागतील आणि तसे न केल्यास जीविताला धोका होईल, अशी भीती घातली. ही भीती दाखवून आरती मनोहर गायकवाड (रा. कोळपिंपरी, ता. धारूर) हिने वेळोवेळी फोन करून साखरे कुटुंबीयांकडून २७ सप्टेंबर २०२४ ते २१ नोव्हेंबर २०२४ या काळात ऑनलाइन आणि रोख स्वरूपात तब्बल १० लाख ६२ हजार रुपये घेतले. वारंवार पैसे उकळत असून लक्षात येताच आरती यांनी तक्रार दाखल करण्याचे ठरवले. शेवटी फसवणुकीची तक्रार दाखल केली. त्यानंतर मरणाची भीती दाखवली. दुसऱ्याकडून उसने पैसे आणले आहेत आता ते पैसे परत कसे करायचे. संगीता साखरे यांनी फसवणुकीची तक्रार दिंद्रुड पोलिस ठाण्यात दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. तिच्यावर महाराष्ट्र जादूटोणा विरोधी ▶▶पान २ वर

## गूगळादेवी नैसर्गिक शेतकरी गट व समृद्धी महिला नैसर्गिक शेतकरी गट

# दोन्ही गटांनी काढली एसओपीची फेरी

मौजे ईट, (प्रतिनीधी):- पाणी फाउंडेशन फार्मर कप २०२४- २५ सहभागी असलेले ईट गावातील दोन गट गूगळादेवी नैसर्गिक शेतकरी गट व समृद्धी महिला नैसर्गिक शेतकरी गट या दोन्ही गटाच्या माध्यमातून पाणी फाउंडेशन शिकवलेल्या पूर्ण एसओपीचे बोर्ड तयार करून गावांमध्ये प्रभात फेरी काढली त्यामध्ये प्रथमता आर्वी येथील प्रशिक्षण, नंतर केलेली गट बांधणी, माती परीक्षण, उन्हात उताराला आडवी नांगरट, दशपर्णी अर्क तयार करणे, योग्य वनाची निवड, एकत्रित निविष्ठा खरेदी बियाणे, खत खरेदी, उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया करणे, बुरशीनाशक, रासायनिक, आणि जैविक नंतर, इक्रने पेरणी करणे, दोन ओळीतील व रोपातील योग्य अंतर, निमार्क फवारणी, दशपर्णी अर्क फवारणी, सायकल कोळपे, बैल कोळपे करणे, इर्जीक पद्धतीने चिकटसापळे लावणे, कामगंध सापळे लागणे, पक्षी थांबे लावणे , जैविक बुरशीनाशक कीटकनाशक फवारणी करणे, एकत्रितपणे नियोजित करून पीक कापणी करणे, तसेच पूर्ण तयार केलेला माल महाबीजला देणे तसेच पुढच्या वर्षीच्या बियाण्यासाठी स्पायलर सेपरेटर मधून माल चाळणी करून बियाणेण्यासाठी ठेवणे दोन्ही गटांनी प्रगतशील शेतकरी यांच्या भेटीगाठी त्यामध्ये कृषी प्रदर्शन परळी येथील भेट, दुसरी लोळदगाव येथे शिवराम घोडके कृषी भूषण यांच्याकडे अभ्यास भेट, तसेच केवीके खामगाव येथे अभ्यास भेट, गांधणवाडी आष्टी येथे प्रगतशील शेतकरी यांच्या भेटीगाठी ,तसेच कनेरी मठ कोल्हापूर येथे अभ्यास भेट, गेवराई प्रदर्शन अभ्यास भेट, कृषक कृषी महोत्सव बारामती ▶▶पान २ वर



# वडवणी ते चिंचोटी रस्ता दुरुस्त करा

## अन्यथा रास्ता रोको करणार-विनोद काकडे

वडवणी, (प्रतिनिधी):-वडवणी ते चिंचोटी तीन किलोमीटर रस्ता अत्यंत खराब झाला आहे या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ता आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे या खड्ड्यावर अनेक अपघात होऊन नागरिक जखमी झाले आहेत वेळोवेळी मागणी करूनही रस्त्यावरील खड्डे बुजवले जात नाहीत येत्या २० तारखेपासुन राजा हरिश्चंद्र पिंप्री येथे शिवरात्र महोत्सव होत आहे. या रस्त्यावरील खडे येत्या २० तारखेपर्यंत तात्काळ न बुजवलपास सर्व गावकर्यांना घेऊन रास्ता रोको करण्याचा इशारा वंचित बहुजन युवा आघाडी तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी वडवणी तहसीलदारांना लेखी निवेदनातुन दिला आहे. चिचोटी रस्ता पूर्ण खड्डामय झाला आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी अवस्था झाली आहे. मोठे मोठे जीवघेणे खड्डे झाले असून त्यामुळे मानवी नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या रस्त्यावरून चार ते पाच गावचे लोक दळणवळण करतात. या रस्त्यावरून विद्यार्थी बसेस, विद्यार्थी रिक्षा, खाजगी वाहन वाहतूक करत आहेत. या खड्ड्यामुळे वाहन चालकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच येत्या २० तारखेला राजा हरिश्चंद्र संस्थान पिंपरी येथे महाशिवरात्री महोत्सव सुरू होत आहे. आणि या देवस्थानाला महाशिवरात्री निमित्त जिल्ह्याभरातून हजारो भावीक येतात. या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या २० तारखेच्या अगोदर या रस्त्याचे ▶▶पान २ वर



# शेतरस्त्याचा सर्वे करून महसुली अभिलेखात नोंदणी करावी

## शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगाचे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन

शिरूर, (प्रतिनिधी):-मौजे हिवरसिंगा सज्जा अंतर्गत प्रचलित व सद्यस्थितीत वापरातील वहिवाटीत असणारे पायवाट, गाडीवाट, शेत रस्ते, पांदन रस्ते, नंबर बांध रस्ते, शीव रस्ते, इतर जोडरस्ते,या मधील बहुतेक रस्त्यांची नोंद महसुली अभिलेख, तलाठी यांचे अभिलेख, भूमी अभिलेख मधील गाव नकाशे या मध्ये नोंद आढळून येत नाही.तसेच यामधील बहुतेक रस्ते पूर्वापार आहेत,परंतू त्यांची जायमोका पाहणी व त्यांची नोंद अभिलेखात नाही.त्यामुळे अनेक ठिकाणी शेतक-यांना अनेक समस्या येत आहेत.शेती औजारे,बियाणे-खते,शेतमाल वाहतुक करणे यावेळी विविध समस्यांना सामना करावा लागत आहे. वहिवाटि खाली असणारे रस्त्यांची दप्तरात नोंद नसल्याने या रस्त्यांसाठी शासकिय योजना मधून मजबुतीकरण,पांदन रस्ते,तसेच ग्रामीण मार्ग योजनेत घेता येत नाहीत. ▶▶पान २ वर



# परळीत लवकरच शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय

## ना.पंकजा मुंडे यांच्या आदेशानंतर हालचाली वेगवान

परळी, (प्रतिनिधी):-परळी येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी अधिकृत आदेश दिले आहेत. या महाविद्यालयासाठी आवश्यक जागेची पाहणी करण्यासाठी पशुविज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम रविवारी परळीत दाखल होत आहे. नुकत्याच बारामती येथे झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजा मुंडे यांनी परळी वैजनाथ आणि बारामती येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार, महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयी-सुविधांचे निरीक्षण आणि भारतीय पशू चिकित्सा परिषद, नवी दिल्लीच्या मानकांनुसार आवश्यक बाबींचे मूल्यमापन करण्यासाठी विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष तसेच पशुविज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस. व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी. व्ही. तायडे आणि तांत्रिक अधिकारी डॉ. पी. ई. ताकसांडे रविवारी परळीत जागेची पाहणी करणार आहेत. या वेळी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या निरीक्षणानंतर महाविद्यालयासाठी अंतिम जागा निश्चित केली जाणार आहे. शुक्रवारी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ना. पंकजा मुंडे यांनी पर्यावरण आणि परळीतील नव्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसंदर्भात आढावा बैठक घेतली. यामध्ये अधिकाऱ्यांशी चर्चा करून नियोजित कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.लवकरच या महा विद्यालयाच्या उभारणीच्या कामाला गती मिळणार असून, परळीतील विद्यार्थ्यांसाठी आणि पशुसंवर्धन क्षेत्रासाठी ही मोठी संधी ठरणार आहे.

